RNI no: MAHMAR / 2004 / 13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Date of Publication : 12th February 2014 ✸ Posting : 15th February 2014 ✸ Pages : 34
Posted at : Mumbai Patrika Channel Sorting Office, GPO, Mumbai 400001

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : अकरा | अंक : आठवा | फेब्रुवारी २०१४



आ कृपाल गुरु मैं शगन मनौंदी हां (भजन) 4

परिवर्तन (महाराज कृपाल सिंहजींद्वारे एक संदेश) 5

अमृतवेळ (ध्यान-अभ्यासाविषयी मार्गदर्शक संदेश) 19

सेवा (सत्संग : गुरु अर्जुन देवेजींची वाणी) 23

मालक मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट १२५, वडाला उद्योग भवन, मुंबई - ४०००३१ येथे छापून सी/५०३ म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०००६७ फोन नं: (०२२) २४९६५००० येथून प्रसिद्ध केले. १२८

आ कृपाल गुरु मैं शगन मनौंदी हां

आ कृपाल गुरु मैं शगन मनौंदी हां,
के दर्शन दे जाओ मैं वास्ते पौंदी हां,

आओ सतगुरु जी मैं अरजां करदी हां,
तेरी संगत दा मैं पानी भरदी हां, आ कृपाल गुरु...

तेरी झलकी तों सूरज शरमौंदा ऐ,
तेरी महिमा दा कोई अंत ना पौंदा ऐ, आ कृपाल गुरु...

तेरे बचनां ते मैं आण खड़ो गई हां,
रख लै पत्त साईयां मैं तेरी हो गई हां, आ कृपाल गुरु...

भिच्छिया पांवी तूं हैं परउपकारी वे,
खाली मोड़ी नां दर आऐ भिखारी वे, आ कृपाल गुरु...

तेरी संगत दा तूं आप सहारा हैं,
तेरे दर आया 'अजायब' विचारा है, आ कृपाल गुरु...

परिवर्तन

परम संत कृपाल सिंह महाराजांनी दिलेला एक महत्वपूर्ण संदेश,
साऊथ फ्लॉरीडा – डिसेंबर १९७२

प्रिय बंधू–भगिनींनो! लोक आंतरिक शांती मिळविण्याकरिता आक्रोश करीत आहेत की आम्हांस शांती कोठून मिळेल? खरेतर आपणांस आपल्या हृदयाद्वारेच शांती मिळू शकेल. आपण परमात्म्याकडे शांतीकरिता प्रार्थना करावयास हवी, तसेच शांतीच्या संदेशाचादेखील प्रसार करावयास हवा.

हे **परिवर्तन** शरिरीक नसून मनाच्या वाईट प्रवृत्ती विरुद्ध असावे, कारण ती प्रवृत्ती आपणांस परमात्म्यापासून दूर ठेवते. आपण लोकांना शांती प्राप्तीचा खरा मार्ग समजावल्यानंतरच आपणांस शांती लाभेल. सद्विचार, सद्वचन व सरतेशेवटी सत्कर्मांद्वारेच आपणांस सत्याचे आकलन होऊ शकते.

हे जग स्वयंभू नाही. वैज्ञानिकांनी संशोधन करून हा निश्कर्ष काढला आहे की या विश्वाचे नियंत्रण एका महान शक्तीच्या हातात आहे, जी सचेत आहे. हे विश्व त्या शक्तीद्वारेच नियंत्रित आहे. पूर्व काय अन पश्चिम काय, धरती असो का आकाश, सर्वांचीच निर्मिती परमात्म्याने केलेली आहे.

एकदा गुरु नानक देवजी महाराज मक्का येथे गेले. एके रात्री ते काबाच्या (मुस्लिम धार्मिकांचे पवित्र स्थान) दिशेने पाय करून पहुडले होते. त्या अवस्थेत गुरु नानक देवजींना पाहून तेथील एक धार्मिक व्यक्तीने त्यांना रागावून विचारले, ''तू परमात्म्याच्या घराच्या दिशेने पाय करून का पहुडला आहेस?'' गुरु नानकदेवजी त्यास प्रेमाने म्हणाले, ''प्रिय मित्रा! मला तर सर्वत्रच परमात्मा दिसतो. अशी एकही जागा नाही, जी परमात्म्याने व्याप्त केलेली नाही. तू माझे पाय जेथे परमात्मा नाही त्या दिशेने कर.''

सर्वप्रथम आपण हे समजून घेणे गरजेचे आहे की, ज्या स्थानी परमात्म्याची विनम्रतेने, आदबिने भक्ती केली जाते, ते स्थान पुजनीय असते.

एक मुस्लिम संत म्हणतात की ही सर्व धरती परमात्म्याची आहे. माझ्या शिष्यांना जेव्हा परमात्म्यासमोर प्रार्थना करण्यास वेळ मिळेल, तेव्हा ते या धरतीवर कोठेही बसून प्रार्थना करू शकतात. त्यांचे तोंड कोणत्या दिशेने आहे याचा काहीच फरक पडत नाही. कुराणामध्ये देखील सांगितले गेले आहे की परमात्मा सर्वत्र आहे. तुम्ही पूर्व वा पश्चिम, कोणत्याही दिशेकडे आपले तोंड करून परमात्म्याची प्रार्थना करू शकता.

सर्वप्रथम आपण हे समजून घेणे गरजेचे आहे की, आपण त्या परमात्म्यामध्ये, तर परमात्मा आपल्या अंतरात सामावलेला आहे. तो आपल्या चोहोबाजूस, वर–खाली सर्वत्र आहे. मासा ज्याप्रमाणे पाण्यामध्ये रहात असतो, त्याचप्रमाणे आपले अस्तित्व परमात्म्यामध्ये आहे. त्याने सर्वांना एकसमान अधिकार दिले असून त्याच्यासमोर लहान–मोठा, पूर्व–पश्चिम असा कोणताही भेदभाव नाही. सर्वांचा जन्म एकाच पद्धतीने होतो. सर्वांना एकसमान बाह्य सुविधा, उदाहरणार्थ डोळे, कान इत्यादी दिलेल्या आहेत. परमात्मा आपल्या हृदयामध्ये वास करीत असतो. आपण नम्रतेने त्याची प्रार्थना करीत असलेली सर्व स्थाने पुजनीय आहेत.

मागील वेळी मी येथे आलो असता पूर्व आणि पश्चिमेकडील लोकांनी मिळून सभा आयोजीत केली होती. अमेरिकेतून जे लोक या सभेसाठी आले होते, त्या लोकांमध्ये मी देखील एक होतो. त्या सभेत सर्वांनी ते कोठून आले आहेत ते सांगितले. माझी बोलण्याची वेळ आली असता, मी म्हणालो, ''असे म्हटले जाते की पूर्व, पूर्व आहे, तर पश्चिम पश्चिम आहे. हे दोघे कधी एकत्र येऊ शकत नाहीत. परंतु सत्य हे आहे की पूर्व वा पश्चिम असे काहीच नाही. हे संपूर्ण विश्व परमपिता परमेश्वराचे घर असून, सर्व देश या घरातील खोल्या आहेत. आपण आपल्या आकलन शक्तीनुसार या गोष्टी बनविल्या आहेत.'' ही बाब जर तुम्ही समजून घेतलीत, तर तुमच्या दृष्टीकोनातच **परिवर्तन** होऊन जाईल. तुमच्या लक्षात येईल की या विश्वाच्या पित्या

परमेश्वराची आपण लेकरे आहोत व परमात्मा सर्व प्राणीमात्रांचा पिता आहे. परमात्म्याचा सच्चा पितृभाव आणि मनुष्याचा भातृभाव एकत्र आल्यास, त्यास मी परमात्म्याचे पवित्र **परिवर्तन** म्हणेन.

भगवान कृष्ण म्हणतात, ''जो मला सर्वांमध्ये पाहतो, तो मला प्रिय आहे.'' सतगुरु जेव्हा या जगामध्ये येतात, तेव्हा ते हाच संदेश घेऊन येतात की परमात्मा येथेच असून आम्ही त्यास पाहिले आहे. परंतु त्यांनी परमात्म्यास कोणत्या नेत्रांनी पाहिलेले असते? परमात्म्यास पाहू शकणारे नेत्र सर्वांमध्ये असून, ते आपल्या या बाह्य नेत्रांहून वेगळे असतात. या नेत्रांना तिसरे नेत्र असे संबोधले जाते. परमात्मा या जगात अगदी स्पष्ट स्वरूपात प्रगट आहे व याचे सर्वांच्या हृदयामध्ये वास्तव्य आहे. खरेतर आपले हे शरीरच परमात्म्याचे असली मंदीर आहे. आपण जर या गोष्टीस समजून घेतल्यास आपल्या अंतरामध्ये सद्विचार निर्माण होऊन आपण सत्कर्मे करू लागतो.

आपण सर्वांनी निरनिराळ्या धर्मांच्या अनुयायांच्या रूपात शरीर धारण केले असले, तरीही आपण सर्व एक आहोत. परमात्म्याची प्राप्ती हेच सर्व धर्मांचे अंतिम ध्येय आहे. परंतु परमात्म्याचे आकलन होण्यासाठी, अगोदर आपण स्वतःला समजून घेणे आवश्यक आहे. मन आणि ज्ञान या बाह्य शक्तींच्या मदतीने आपण परमात्म्यास ओळखू शकत नाही. आपला केवळ आत्माच परमात्म्यास ओळखू शकतो. परमात्मा एक असूनही या जगात त्याची भक्ती करण्याच्या अनेक पद्धती आहेत. परंतु अंतिम आणि आंतरिक मार्ग हा सर्वांसाठी एकच आहे. एक मुस्लिम संत रजाब म्हणतात, ''धनुर्धारी अनेक असले तरीही त्या सर्वांचे निशाण एकच असते.'' एखादे अध्यात्मिक गुरुच आपणांस अंतर्यातील रस्त्यावर मार्गदर्शन करु शकतात, ज्यायोगे आपणांस खरी शांती तसेच खरे ज्ञान मिळू शकेल. अजूनपर्यंत कोणताही नेता या जगामध्ये शांती, एकता व सहचार्याची भावना आणू शकला नाही. जर त्यांनी खऱ्या अध्यात्मिक गुरुं सोबत एकता व सहचार्याने कार्य केले, तर सर्वांना लवकरात लवकर शांतीचा लाभ होईल.

सतगुरुंना बालपणापासूनच परमात्म्याबद्दलचे ज्ञान असते. शिक्षण प्राप्त करण्यासाठी गुरु नानकदेवजींना शाळेत घातले गेले. शिक्षक सर्वांना शिकविण्यास सुरुवात करीत म्हणाले, ''एक, दोन,...'' शिक्षक पुढे शिकवत असताना, गुरु नानकदेवजींनी त्यांना विचारले, ''कृपया थांबा! तुमच्या दृष्टीने एक या शब्दाचा काय अर्थ आहे?'' गुरु नानकदेवजींना ज्ञान असल्याने ते पुढे बोलू लागले, ''या एकचा अर्थ आहे की येथे परमेश्वर एकच आहे. तो अनंत असून, या विश्वाचा तो कर्ताकरविता आहे. त्याचे कोणाशी शत्रुत्व नसून, त्यास कोणाचेही भय नाही. तो स्वयंभू असून त्याचा कोणीही निर्माता नाही.''

तेव्हा शिक्षकाने गुरु नानकदेवजींना विचारले, ''हे कसे बरे होऊ शकते?'' त्यावर गुरु नानकदेवजी उत्तरले, ''हे सतगुरुंच्या कृपेने मिळालेले, त्यांनी दिलेले बक्षिस आहे. मी हे सांगतो की परमात्मा एक आहे, कारण याचा अनुभव सतगुरुच देऊ शकतात व ते तसे सिद्ध देखील करू शकतात. बाह्य बंधनांची जाळून राख करून त्याची शाई करा व स्वतःच्या ज्ञानानं परमात्म्याची प्रशंसा लिहीत जा. आपण जेव्हा स्वतःस, स्वतःच्या ज्ञानानेच समजून घ्याल, तेव्हा आपण पाहू शकू की आपण कोण आहोत?''

कबीर साहेब म्हणतात, ''मी जर 'एक' म्हटले तर 'दोन' चा प्रश्न उभा राहतो. परमात्म्यास केवळ शब्दाच्या मदतीनेच ओळखले जाऊ शकते, त्यास अनुभवले जाऊ शकते. परंतु त्याचे वर्णन भाषेतील शब्दांमध्ये केले जाऊ शकत नाही.'' आपण परमात्म्यास एक का म्हणतो, याचे कारण समजावताना गुरु अर्जुनदेवजी महाराज आम्हांस सांगतात की,''आपण सिमांनी बध्द आहोत. हे परमात्मा! तू अनंत आहेस. पूर्ण परमात्म्यास कोणीही पाहू शकत नाही. तो नामरूपी, शब्दरूपी आहे.''

प्रत्येक मनुष्याच्या अंतरात एक गुप्त कोठडी असते. ह्या कोठडीचे अस्तित्व आपल्या मनाच्या तसेच बुद्धीच्या पलिकडे आहे, तिच्यामध्ये परमात्म्याचे राज्य आहे. आपण जेव्हा संतांकडे जातो, तेव्हा ते आपले लक्ष या बाह्य जगातून दूर करतात व या कोठडीचे द्वार उघडतात.

मोहम्मद साहेब सांगतात, ''खुदाचे तेज मनुष्य मंदीरामध्ये आहे.'' वेळोवेळी संत या जगात येऊन आम्हांस हे समजावत असतात.

भगवान कृष्ण सांगतात, ''मी तुम्हांस दिव्य प्रकाश प्रदान करीन, ज्याच्या मदतीने तुम्ही माझे सौंदर्य पाहू शकाल.'' महात्मा बुध्दांनी देखील हेच सांगितले आहे, ''प्रत्येक मनुष्याजवळ एक प्रकाशमान आरसा असतो.'' बुध्दाच्या अनुयायांनी याचा अनुभव घेतलेला आहे.

वसंत ऋतू समीप येत असून आणखीन सर्वोच्च पातळीपर्यंत पोहचलेले संत या जगात येतील. परमात्म्याच्या कृपेने आपणांस त्यांच्या संगतीची संधी लाभेल. सुरुवातीला बराच काळ शिष्याची परिक्षा घेतल्यानंतरच या गोष्टी (नाम, ध्वनी वगैरे) शिष्याच्या कानात सांगितल्या जात असत, परंतु आता या गोष्टी कोणताही भेदभाव न करता सरसकट प्रदान केल्या जातात.

महात्म्यांनी मनुष्य रूपात जन्म घेतला, कारण आपण मनुष्यरूप धारण केलेल्या परमात्म्यासच समजू शकतो.

परमात्मा त्याच्या मर्जीनुसार प्रगट होतो. प्रकाश व ध्वनी हेच परमात्म्याचे स्वरूप आहेत. सर्व विश्वाची रचना करणारा परमात्माच असून त्यावर नियंत्रण देखील परमात्म्याच्याच हातात आहे. बायबलमध्ये सांगितले आहे की विश्वाच्या निर्मितीपूर्वी ध्वनी होता व तो परमात्म्याच्या सोबत होता. वेदांमध्येदेखील हेच सांगितले गेले आहे की विश्वनिर्मितीपूर्वी प्रजापती होते, त्यांच्यासोबत ध्वनी होता व खरेतर तो ध्वनी परमश्रेष्ठ ब्रम्हा होता. प्रजापती या विशेषणाचा वापर परमात्म्यासाठी केला गेला आहे.

गुरु नानकदेवजी महाराज तसेच इतर सर्वच संतांनी आम्हांस सांगितले आहे की या सर्व विश्वाचा निर्माता नामच आहे. अशी इतर अनेक उत्तम नामे आहेत जी नामाच्या शक्तीचे वर्णन करतात. या दोहोंच्या दरम्यान काही असे शब्द आहेत, जे त्या शक्तीचे वर्णन करतात. या विश्वाच्या निर्मितीचे कारण ती शक्ती असून तिच्या बाह्य स्वरूपाचे वर्णन म्हणजे प्रकाश व ध्वनी आहेत.

शिखांच्या नवव्या गुरुंना अर्थात गुरु तेग बहादुरजींना विचारले गेले, ''ते नाम कोणते आहे, ज्याचे स्मरण केल्याने निर्वाणपद प्राप्त होऊ शकेल (मुक्ती लाभू शकेल)? व ज्याची सातत्याने पुनरुक्ती केल्याने मनुष्य संसारीक विचारां पलिकडे जातो?'' गुरु तेग बहादुरजींनी उत्तर दिले, ''नामामध्ये परमात्म्याच्या शक्तीचे वर्णन केलेले आहे, ज्याचे बाह्यवर्णन प्रकाश व ध्वनी हे आहे. या शक्तीचे वर्णन करण्यासाठी हजारोंच्या संख्येने संतांद्वारे नाम दिले गेले आहे. नामाच्या संपर्कात येणे केवळ मनुष्य जन्मामध्येच शक्य आहे.''

गुरु अर्जुनदेवजी म्हणतात, ''नामाचा संपर्क आपणांस तेजोमय करतो. ते तेज करोडो सूर्यांच्या तेजासमान आहे. मी केवळ समजावण्यासाठी हे उदाहरण देत आहे. खरेतर सतगुरु या शब्दाचा अर्थ काय आहे? आपण राम म्हणतो, राम या शब्दाचा अर्थ असा आहे की सर्वांमध्ये रमून जाणे.''

केवळ परमात्म्याच्या कृपेनेच खरा शिष्य प्रार्थना करतो, ''हे परमात्मा! माझ्या अंतर्यामध्ये पवित्र नामाचा प्रकाश प्रकट कर.''

कबीर साहेबांनी सांगितले आहे, ''नामच मुक्तीदाता आहे. एखादी अतुलनीय आत्माच या नामास समजू शकते आणि त्याचे अस्तित्व सिद्ध करू शकते. त्या शक्तीचे दर्शन केवळ आंतरिक नेत्रांद्वारेच केले जाऊ शकते, ते नाम प्रत्येक मनुष्याच्या अंतरात गुप्त असते. परंतु केवळ एखाद्या सतगुरुंच्या कृपेनेच आपण त्या नामास अंतरात प्रगट करू शकतो.''

पाणी एक तरल पदार्थ असून त्यास इंग्रजी भाषेत वॉटर, हिंदी भाषेत जल वा नीर आणि उर्दूमध्ये पानी असे संबोधले जाते. ज्या पाण्याने आपली तहान भागवली जाते, त्या तरल पदार्थाचे वर्णन हे सर्व शब्द करतात. याप्रमाणेच परमात्म्याच्या शक्तीचे वर्णन ध्वनी, नाम वा कलमा या शब्दांनी केले जाते. सतगुरु आपले आंतरिक नेत्र उघडतात, ज्यायोगे शरीरापासून काही प्रमाणात उच्च पातळीवर जाणाऱ्या शक्तींना पाहण्यास आपण सुरुवात करतो. नामाप्रती समर्पण हीच खरी पुजा आहे. आत्मा हाच परमात्मारुप आहे. आपण आत्म्याद्वारेच परमात्म्याची आराधना करू शकतो.

गुरु अमरदेवजी महाराज म्हणतात, ''पुजा, आराधना तर प्रत्येकजण करतो. परंतु इंद्रियांच्या आहारी जाऊन ते मुक्ती मात्र साध्य करू शकत नाहीत. नामामध्ये सामावले जाणे म्हणजेच मनास पवित्र करणे होय. आपण वास्तव्य करीत असलेले शरीर हे परमात्म्याचे सच्चे व पवित्र मंदीर आहे, परमात्मारूपी शक्ती त्यामध्ये वास करीत आहे.''

आता प्रश्न निर्माण होतो की असे असूनही आपण परमात्म्यास का बरे पाहू शकत नाही? संत म्हणतात की आम्ही जर परमात्म्यास पाहू शकतो तर तुम्ही का बरे पाहू शकत नाही? संत सांगतात की तो सूक्ष्माहून सुक्ष्म अवर्णनीय आणि अगम्य आहे, ज्याप्रमाणे आपण हवेस अनुभवू शकतो, परंतु पाहू मात्र शकत नाही. आपण मायक्रोस्कोपमधुन निरीक्षण केल्यास आपल्या लक्षात येईल की हे वायुमंडळ सूक्ष्म जीवांनी भरलेले आहे. आपले नेत्र जर मायक्रास्कोपप्रमाणेच सूक्ष्मदर्शक बनले, तर आपण परमात्म्यास पाहू शकू.

तुलसी साहेब म्हणतात, ''आपण अंध आहोत. अशा निर्जीव जीवनाचा आम्ही धिक्कार करतो. परमात्मा आपल्या अंतरात असूनही आपण त्यास पाहू शकत नाही.'' कबीर साहेब म्हणतात,''हे सर्व जग एखाद्या अंध व्यक्तीप्रमाणे अंधारात परमात्म्याचा शोध घेत आहे. एखाद-दुसऱ्या व्यक्तीचा प्रश्न असता तर त्यात सुधारणा घडविता आली असती. परंतु मी जेथे पाहतो, तेथे मला अध्यात्मिक दृष्ट्या सर्वचजण अंध दिसत आहेत.'' सतगुरु आपले आंतरिक नेत्र उघडतात. जर एखाद्यास पूर्ण सतगुरु भेटले नाही, तर तो परमात्म्यास पाहू शकत नाही. तो सतगुरु चरणी आल्यावरच, त्यास परमात्मा दिसू लागतो. सतगुरु समीप येण्यापूर्वी आपण मृत होतो. जेव्हा सतगुरु आपणांस नामदानासाठी बसवितात, तेव्हा आपण जिवंत होतो. सतगुरुंकडे येते वेळी आपण अध्यात्मिकदृष्ट्या बहिरे होतो. त्यांनी आपणांस जेव्हा नामदानासाठी बसविले तेव्हा आपणांस ध्वनी ऐकू येऊ लागला. ज्ञान, अंतर्ज्ञान आणि विवेक काही प्रमाणामध्ये आपणांस सत्य समजण्यास मदत करतात.

गुरु नानकदेवजी महाराज म्हणतात की, अंधास दरवाजाची माहिती नाही. येशू या संदर्भात सांगतात की तुम्ही या दरवाजास खटखटावले तरच तो उघडेल. माझा आवाज जो कोणी ऐकत असेल, मी त्याच्यात रमेन व तो माझ्यात रमून जाईल.

कबीर साहेब म्हणतात की, मी मक्का येथे जात असताना वाटेत परमात्मा भेटला. तो मला दम देत म्हणाला,''ओ कबीर! तुला कोणी सांगितले की मी येथे रहात आहे? काय मी तुझ्या अंतर्यात नाही? तू येथे का येत आहेस? आपण जर या शरीरास सोडून, परमात्म्यास बाह्य जगात शोधत राहिल्यास, तो आपणांस सापडेल काय?'' तिर्थस्थान, धार्मिक मंदिर आपणांस केवळ आठवण करून देतात की या जगात काहीतरी आहे.

गुरु नानकदेवजी महाराजांनी अतिशय सरळ व सोपा प्रश्न मांडला आहे की आपण परमात्म्यास पाहू शकतो काय? होय! चराचरामध्ये परमेश्वर आहे. सतगुरु जे पाहतात, त्याचेच वर्णन ते करून सांगतात.

वेद सांगतात की परमात्मा तुमच्या एवढा समीप आहे की त्याच्या इतकी दुसरी कोणतीही वस्तू तुमच्या समीप नाही. परमात्माच तुमचे आयुष्य आहे, जीवन आहे. कबीर साहेब म्हणतात, ''एक वेळ अशी होती की मी दुविधेमध्ये होतो. परंतु माझे नेत्र जेव्हा उघडले, तेव्हा माझा सर्व भ्रम दूर झाला, मी परमात्म्यास सर्वत्र पाहिले.''

सतगुरु सांगतात की तुम्हांस देण्यासाठीच मी या जगात आलेलो आहे. हे परमात्म्यातर्फे बक्षिस असून तुम्ही ते मोफत घ्या. तुम्हांस सूर्यप्रकाशासाठी वा हवेसाठी पैसे खर्चावे लागतात काय? सतगुरु सर्वांना देण्यासाठी येतात, कोणाकडून घेण्यासाठी येत नाहीत; ते स्वावलंबी असतात. शम्स तबरेज सांगतात की तुमचा प्रिय तुमच्या अंतर्यात आहे. तुम्ही त्या परमात्म्यास स्वतःच्या नेत्रांनी पहाण्यायोग्य तसेच त्याचा ध्वनी आपल्या आंतरीक कर्णांनी ऐकण्यायोग्य होणे आवश्यक आहे.

आपण आपले ते नेत्र कसे उघडावे ज्यानेत्रांतून आपणांस परमात्मा दिसू शकेल? जेव्हा तुम्ही आपले नेत्र बंद करता तेव्हा अंधार असतो. तुम्ही त्यात प्रवेश करून पहा, तुम्ही त्यात आपले ध्यान एकग्र करुन पहा. तसे करणे म्हणजे दरवाजा वाजवल्याप्रमाणे आहे व तो जरुर उघडेल. आपण सरळ त्यात पहात रहा, आपणांस प्रकाश दिसेल.

तुलसीसाहेब, शम्स तबरेज व इतर सर्व संत एकच गोष्ट सांगतात की तुम्ही ध्यान अभ्यासात बसा. तुलसी साहेब सांगतात, तुम्ही अंतर्यातील अंधःकारामध्ये प्रवेश करण्यासाठी सतगुरुंच्या चरणी बसा. ते तुम्हांस अंतरातून वरील पातळीवर नेतील व तुम्ही प्रकाश पाहू शकाल. जोपर्यंत मनुष्य इंद्रिय भोगांची पातळी सोडून वरती जात नाही, तोपर्यंत त्याच्या अंतरातील परमार्थाचा मार्ग मोकळा होत नाही.'' यासाठीच असे म्हटले गेले आहे की, हे मनुष्या! तू स्वतःची ओळख करून घे की तू कोण आहेस? आपल्या जवळ ध्यान आहे. आपण जेव्हा आपले लक्ष बाह्य जगातून हटवून स्वतःच्या अंतर्यात एकाग्र

करतो, तेव्हा तेथे तुम्हांस प्रकाश दिसू लागतो. परंतु असे असूनही आपण तो प्रकाश का बरे पाहू शकत नाही? कारण विचारांच्या छोट्या-छोट्या अनेक लाटा आपल्या अर्धसचेत मनाच्या जलाशयात निर्माण होतात. जोपर्यंत त्या लाटा स्थिरावत नाहीत, तोपर्यंत तुम्ही त्यास पाहू शकत नाही. ज्याप्रमाणे एखादे तळे गवताने झाकलेले असल्यास, त्यावरील गवत सावकाशपणे दूर केल्यानंतर जसे त्या तलावाच्या पाण्यात आपण आपला चेहरा पाहू शकतो, त्याप्रमाणेच ही प्रक्रिया आहे. ते गवत म्हणजे तुमचे शरीर असून या शरीरापासून या जगातील ऐहीक मोहांची सुरुवात होते.

आपल्याजवळ शरीर असून त्या शरीराच्या कुवतीनुसारच आपण कामे करतो. जीवनातील प्रत्येक मिनिटागणीक हे शरीर बदलत रहाते, कारण हे मांसाचे बनलेले आहे. आपल्या आजुबाजूचे जगही बदलत आहे कारण ते घनपदार्थांनी बनलेले आहे. ते केवळ मायावी असून या मायावी जगातून बाहेर पडण्याच्या मार्गाचे वर्णन सतगुरु करीत असतात.

सर्व सतगुरुंचे आपणांस एकच सांगणे असते की, आपण आपल्या शरीराच्या आस्थेपासून वरील पातळीवर जावे. जिवंतपणीच मरण्याची कला शिकून घ्यावी, जेणेकरून आपण पुन्हा नविन जीवन जगण्यास सुरुवात करू शकू. आपले बाह्य जगातील लक्ष दूर हटवून आपल्या आत्म्याच्या सिंहासनावर लक्ष केंद्रात करावे, यासच ध्यान-अभ्यास व नामस्मरण करणे म्हणतात. हे ध्यान-अभ्यास व नामस्मरणच परमात्म्याकडे परत जाण्याचा मार्ग असून परमात्माप्राप्ती करणे केवळ मनुष्यजन्मातच शक्य आहे. हा मनुष्य जन्म मिळण्यासाठी सर्व देवी-देवता तळमळत असतात.

कबीर साहेब म्हणतात,''हे मनुष्या! तू जर परमेश्वरास जाणू शकला नसशील तर तू कोणत्या गोष्टीचा अहंकार करीत आहेस? तुमचे हेच मोठेपण आहे की तुम्ही या जन्मामध्ये परमात्म्यास पाहू शकता.'' मनुष्याचे जेव्हा सर्व प्रयत्न असफल होतात, तेव्हा प्रार्थना सफल होते. अशावेळी परमात्म्या समोर



आपण प्रार्थना करतो की आम्ही असहायी आहोत. आम्ही मनुष्यरूपी तुरुंगात अडकलेलो आहोत. तू आमच्या मदतीसाठी कोणास तरी पाठव की जेणेकरून आम्हास या मनुष्य जन्मातून ते बाहेर काढतील.

कोणीतरी गुरु अमरदेवजी महाराजांना विचारले की,''बाह्य विश्वातील कोणकोणत्या शक्ती आहेत?'' त्यांनी उत्तर दिले, ''तुम्ही ध्यान अभ्यासामध्ये स्वतः बसून पहा की बाह्य शक्ती कशातऱ्हेने कार्य करीत आहेत. आपले लक्ष जेव्हा बाह्य जगातून दूर हटते, तेव्हा आपले शरीर व्यावहारिक कार्यांसाठी मरण पावते. तुम्ही जेव्हा स्थूल शरीराच्या पातळीवरून उठून उच्च पातळीवर पोहचता, तेव्हा तुम्हांस प्रकाश दिसू लागतो. तुम्ही जर परमात्म्यास पाहू इच्छित असाल, तर तुम्ही अशा कोणाकडे तरी जावे ज्याने स्वतः परमात्म्यास पाहिले आहे. ज्याने स्वतःच परमात्म्यास पाहिले नसल्यास, तो तुम्हास परमात्मा कसा बरे दाखवू शकेल?''



सतगुरु कोण असतात? त्यांनी त्यांच्या मनुष्य शरीरामध्ये परमात्म्यास प्रगट केले असते. सतगुरुंचा अर्थ अंधःकारातून स्फोट होऊन प्रकाशाचे बाहेर येणे हा आहे. परमार्थ प्राप्तीच्या कार्याची सुरुवात करण्यासाठी सतगुरु तुम्हांस काहीतरी देतात.

ब्यास येथे ख्रिश्चन धर्माची एक व्यक्ती होती. त्याने आपल्या सतगुरु महाराज सावन सिंहजींना विचारले, ''तुमचे सतगुरु श्रेष्ठ आहेत की येशू श्रेष्ठ आहेत?'' आपल्या गुरु महाराजांनी अतिशय प्रेमाने उत्तर दिले, ''मी माझ्या सतगुरुंना पाहिले आहे, परंतु येशूला पाहिलेले नाही. तू येशूस माझ्यासमोर आणल्यास मी त्यांना देखील भेटीन.''

सतगुरु जरी त्यांचे शरीर सोडून गेले असतील, तरी त्यांची शक्तीमात्र कार्यरत असते. भुकेलेल्यास भाकरी व तहानलेल्यास पाणी हा मागणी व पूर्तीचा नियम आहे. जे बाळ हजारो वर्षांपूर्वी जन्मास आले होते वा आता जन्मास आले आहे, त्याच्यासाठी परमात्म्याने त्याच्या जन्मास येण्यापूर्वीच दुधाची व्यवस्था मातेच्या शरीरामध्ये केलेली होती.

सत्य सर्वोच्च आहे व सच्चे (निर्मळ) जीवन त्याहीपेक्षा श्रेष्ठ आहे. आपण सर्व परमात्मा निर्मित बंधू-भगिनी आहोत. आपण सर्वजण ज्ञान-सागराचे थेंब आहोत. कोणीही लहान वा मोठे नाही. ज्या शक्तीची आपण पूजा करतो, ती शक्ती आपल्या शरीरास नियंत्रित करत असते. आपण इतरांचा तिरस्कार करू नये की मी उच्च पदवी प्राप्त असलेला, ज्ञानी किंवा श्रीमंत मनुष्य आहे. आपण सर्व एकसमान असून कोणी टेबलावर उभे आहे, तर कोणी खुर्चीवर बसलेला आहे. हा सर्व आपल्या पूर्वकर्मांचा हिसाब-किताब आहे.

तुमच्या विचारांना शुद्ध करा कारण अशुद्ध विचार संपूर्ण शरीरास मलीन बनवितात. जे शरीर केर-कचऱ्याने भरलेले आहे, अशा शरीरामध्ये परमात्म्याने प्रवेश करावा अशी अपेक्षा आपण करू शकतो का? हा सर्व केर-कचरा मनाद्वारे येतो, जो मनुष्याच्या शरीरास मलीन करून टाकतो. ज्यांचे हृदय निर्मळ आहे त्यांना परमात्म्यास पाहण्याचा आर्शीवाद प्राप्त झालेला असतो. परमात्मा मलीन शरीरामध्ये प्रवेश करीत नाही. बल्बमध्ये प्रकाश असतो. परंतु तो बल्ब जर काळ्या डागांनी झाकाळलेला असल्यास आपणांस प्रकाश दिसू शकेल काय? आपले जीवन निर्मळ असावयास हवे.

सतगुरु तुम्हांस सरळ परमात्म्याजवळ जाण्याचा मार्ग देतात. ते तुमच्या बाह्य रिती-रिवाज, रूप, शक्ती वा जीवन जगण्याच्या पद्धतीमध्ये ढवळाढवळ करीत नाहीत. ते तुम्हांस तुमच्या असलेल्या सामाजिक शरीरामध्येच राहू देतात. एकदा काही लोकांनी, आपले गुरु महाराज सावन सिंहजींना विचारले की,''तुम्ही नव्या धर्माची सुरुवात का बरे करीत नाहीत?'' महाराज सावन सिंहजींनी उत्तर दिले,''अगोदरच खूप विहिरी खणलेल्या आहेत. मी आणखीन एक नविन विहिर का खणू?''

सर्व सतगुरुंच्या शिकवणीचा आधार एकच आहे. ते कोणता नविन धर्म बनवित नाहीत, तर ते सर्वांवर प्रेम करतात. ते कोणत्याही धर्म, संप्रदाय, पूर्व वा पश्चिम यांचे एकाधिकारी नसतात. ते संपूर्ण जगासाठी येतात.



ज्याप्रमाणे सूर्य संपूर्ण जगाला प्रकाश देतो, त्याचप्रमाणे सतगुरुंची शिकवण सरळ व स्पष्ट असते. ते तुम्हांस शारिरीक पातळीवरून वरील पातळीवर नेतात, तुमचे आंतरिक नेत्र उघडतात, ज्यायोगे तुम्ही परमात्म्याचा प्रकाश पाहू शकाल. ते आपणांस सुरुवातीस हीच ज्ञानपुंजी देतात की आपणांस शरीराचा त्याग करावयाचा आहे. ते त्याचा मार्ग देखील सांगतात. आपण जर दररोज ध्यान–अभ्यास करत असलो तर आपणांस शरीर त्यागताना खूप आनंद होतो कारण शरीराचा त्याग कसा करावा याचे ज्ञान आपणांस असते. सर्व प्रकारचा प्रकाश, सौदर्यं आपल्या अंतर्यात आहे. सतगुरु बाह्य रिती–रिवाज वा नविन धर्मांमध्ये अडकवित नाहीत. ते हेच सांगतात, परमात्मा तुमच्या अंतर्यात असून सतगुरु हेच परमात्मा आहेत. सुरुवातीस सतगुरु तुम्हांस काही (नाम) देऊ शकतात आणि तुमची मनुष्यरूपी मायाजालातून सुटका करू शकतात. त्यामुळे तुम्ही स्वतः जिवंतपणीच परमात्म्यास पाहू शकता, ज्यासाठी तुम्हांस तुमच्या जीवनाच्या अंताची वाट पाहण्याची गरज नाही.

ज्या सतगुरुंच्या चरणी बसून आपण काही शिकलेलो असतो, त्या सतगुरुंप्रती आपल्या हृदयामध्ये आदरभाव असतो. सतगुरुंनी स्वतः परमात्म्यास पाहिलेले असते, तसेच ते आम्हांस परमात्मा दाखवू शकतात. परंतु यासाठी निर्मळ जीवनाची गरज आहे. तुम्ही प्रथम पाऊल उचलले असून, तुमचे पुढील पाऊल म्हणजे सतगुरुंच्या चरणाशी जाणे हे आहे; हेच **परिवर्तन** होय. ***

अमृतवेळ

परम संत अजायब सिंह महाराजांनी ध्यान–अभ्यासास बसविण्यापूर्वी संगतला दिलेला एक महत्वपूर्ण संदेश – मुंबई – १२ जानेवारी १९८६

परमात्म्याने आपणांस मनुष्यजन्म दिलेला आहे. मनुष्य–जन्माच्या अनेक फायद्यांपैकी हा एक फायदा आहे की, जे काम आपण पशु–पक्षांच्या जन्मात करू शकत नाही, ते काम आपण मनुष्यजन्मामध्ये करू शकतो, ते काम म्हणजे परमात्म्याची भक्ती व परमात्म्याप्रती प्रेम हे होय. आपला आत्मा सतवंश परमात्म्याची कन्या असून ती आपल्या राजघराण्यास विसरलेली आहे. तिने परमात्म्यास विसरून मनाशी मैत्री केली व पापांच्या ओझ्याखाली दबून गेली आहे. जसजसा हा आत्मा परमात्म्यापासून दूरावत गेला, तसतसे स्थूल, सूक्ष्म व कारण या पडद्यांचे आवरण त्यावर चढले गेले. त्यामुळे आता त्यास हेच माहित नाही की माझे खरे घर कोणते आहे? जेव्हा परमात्म्याने या आत्म्यास पापांच्या ओझ्याखाली दबून गेलेले पाहिले, तेव्हा तो संतरूप धारण करून या जगात आला व त्याने स्वतःच आपले रहस्य उलगडून सांगितले. स्वामीजी महाराज सांगतातः

सन्तरूप होए जग में आया, अपना भेद आप उस गाया ।।

गर्मीपासून सुटका मिळावी म्हणून आपण डोंगर–पर्वतावर जातो. आपण जसजसे डोंगराच्या शिखरावर जाऊ लागतो, तसतशी गर्मी कमी–कमी जाणवू लागते, त्याचप्रमाणे जेव्हा आपले सतगुरुंप्रती असलेले प्रेम वाढत जाते तेव्हा ते सतगुरुंवरील प्रेम या जगावरचे प्रेम त्यागण्यास मदत करते. खरे तर संत आपल्या प्रेमाचे भुकेलेले नसतात. ते तर त्यांच्या सतगुरुंच्या प्रेमामध्ये लीन असतात. परंतु परमार्थात ज्यांनी कोणी आपला फायदा करुन घेतला तो केवळ त्याने संतांवर प्रेम करूनच तो फायदा करून घेतला. कारण त्याशिवाय आपण या जगावरचे प्रेम त्यागू शकत नाही, त्या प्रेमावरून सुटका होऊन आपण अंतर्यात उच्च पातळीवर जाऊ शकत नाही.

मला हे पाहून आनंद वाटतो की, तुम्ही आपआपल्या घरातील अनेक बंधने तोडून, घरांच्या जबाबदाऱ्या सोडून काही दिवसांकरीता परमात्म्याच्या आठवणीमध्ये येथे एकत्र आलेले आहात. मी आशा करतो की ज्या उद्देशने, ज्या ध्येयाने तुम्ही येथे बसला आहात, त्या ध्येयावरच तुमचे लक्ष केंद्रीत राहिल. संत आम्हांस स्मरण करण्यासाठी जे नाम देतात, त्या नामामागे त्यांनी स्वतः केलेले तप, त्याग व ध्यान–अभ्यासाची चार्जिंग कार्यरत असते. ते आम्हांस कोठे तरी ऐकलेले वा पुस्तकांमध्ये वाचलेले नाम देत नाहीत. त्यांनी स्वतः अनुभवलेले नामच ते आम्हांस स्मरण करण्यासाठी देतात.

आपण जेव्हा संतांनी दिलेले नामस्मरण सातत्याने करतो, या जगात पसरलेले लक्ष आपण आपल्या दोन्ही नेत्रांच्या पाठीमागे (तिसऱ्या तिळावर) एकाग्र करतो, तेव्हा आपणांस ध्यानस्त होण्याची गरज असते. तसे न केल्यास आपला आत्मा त्या स्थानावरून खाली येतो, पुन्हा (तिसऱ्या तिळावरील एकग्रतेने) वर जातो व पुन्हा खाली येतो. आपण जेव्हा तिसऱ्या तिळावर एकाग्र होऊन संत–स्वरूपाचे सातत्याने ध्यान करू लागतो, तेव्हा आत्मा तेथे टिकू लागतो. तेथे मात्र सेवकाने एवढे ध्यान करणे गरजेचे असते की सेवकाला स्वत:चे अस्तित्व देखील विसरुन जावे लागते, तेव्हाच सतगुरु आणि सेवक एकरूप होतात. गुरु नानकदेवजी महाराज सांगतात:

आप छोड गुरु माहे समाए ।

आपण नामस्मरण करीतच गुरुस्वरूपापर्यंत पोहचू शकतो. अभ्यासी जेव्हा सातत्याने नामस्मरण करीत स्वतःचे अस्तित्व देखील विसरून जातो, सतगुरुंचे प्रत्यक्षात अस्तित्व त्यास जाणवते, तेव्हा आपण सूर्य, चंद्र, तारे पार करून पुढे जातो. तेथे सतगुरु साक्षात प्रगट होतात. तेथे पोहचल्यावर सेवकाची जबाबदारी संपते. पुढे सतगुरु शब्दाद्वारे एका मंडळातून दुसऱ्या मंडळात असे करीत करीत आत्म्यास पार करतात. असे करण्यापूर्वी सतगुरु शिष्यास सांगतात, ''तू ही शब्दरूपी रस्सी घट्ट पकड.'' कारण आत्म्यास शब्दावर स्वार होऊनच ही मंडळे पार करावयाची असतात.

येथे पोहचल्यानंतरच शिष्याच्या अंतरात खरे प्रेम जागृत होते, सतगुरुंप्रती खरी आत्मियता निर्माण होते. यास कारण म्हणजे शिष्य आपल्या नेत्रांनी पाहतो की अंतर्यामध्ये सेवकासाठी सतगुरु किती अतोनात मेहनत करीत असतात. सतगुरुच शिष्यास एक-एक करीत सर्व मंडळांच्या पार कसे नेत असतात. येथे पोहचल्यावर होणाऱ्या आनंदाचे वर्णन आत्मा इतरांना करू शकत नाही. कारण तसे केल्यास त्या आत्म्याची आंतरिक उन्नती ठप्प होते. म्हणूनच ज्याप्रकारे स्त्री आपले शरीर वस्त्रांच्या मदतीने लपवून ठेवते, त्याचप्रमाणे येथे पोहचलेल्या आत्म्याने, त्याने कमावलेला परमार्थ इतरांपासून लपवून ठेवणे गरजेचे असते.

विदेशी प्रेमींच्या ग्रुपसाठी (समुहासाठी) सप्टेंबर महिन्यात दहा दिवसांचा सत्संगाचा कार्यक्रम ठेवलेला होता. त्या कार्यक्रमामध्ये ध्यान अभ्यास करीत एका आत्म्याने खूप प्रगती केली; त्यास अंतर्यात सतगुरुंचे दर्शन झाले. त्यामुळे तो अतिशय उल्हासित झाला व त्याने अंतर्यात जे काही पाहिले, त्याबद्दल सर्वकाही त्याच्या समूह प्रमुखास (ग्रुपलिडरला) सांगितले.

सर्वसाधारणत: सतगुरु समुह-प्रमुख अशाच व्यक्तीस बनवितात, ज्यास सतगुरुंना काही द्यावयाचे असते. परंतु तो समुह-प्रमुख ध्यान अभ्यास करीत नसे. अनेकजण समुह-प्रमुख झाल्यावर सुस्त होतात, ते मानमोठेपणामध्ये अडकून पडतात आणि ध्यान-अभ्यास करीत नाहीत. त्या समूह-प्रमुखाच्या अंतरामध्ये जळफळाट झाला की मी इतक्या वर्षांपूर्वी नाम घेऊनही काही प्राप्त करू शकलो नाही, परंतु याने मात्र माझ्या नंतर नाम घेऊनही इतकी आंतरिक प्रगती केली. त्या उल्हासित झालेल्या बिचाऱ्या प्रेमीची आंतरिक प्रगती खुंटली. त्याने माझ्याकडे येऊन नंतर पस्तावा प्रगट केला.

आपल्या समोर घडलेली एक घटना आहे की महाराज सावन सिंहजींच्या वेळी एका नामधारी मुलीने अंतर्यामध्ये खूप प्रगती केली व त्याबद्दल तिने एका व्यक्तीस सांगितले. त्यानंतर मात्र पस्तावत ती महाराज सावन सिंहजींसमोर उभी राहून रडू लागली की जे काही मला प्राप्त झाले होते, ते सर्व नाहीसे

झाले, कारण ते रहस्य मी एका व्यक्तीस सांगितले. महाराज सावन सिंहजी म्हणाले,''हे बघ मुली! आपण जर एखाद्या कुरुप व्यक्तीस आरसा दाखविल्यास, तो स्वतःचा कुरुप चेहरा पाहून रागाने आरसा फोडून टाकेल. आतामात्र तुला मेहनतीने ध्यान–अभ्यास करावा लागेल. या पुढे मात्र तू कोणास काही सांगू नकोस. आपण आपल्या आंतरिक उन्नतीस आपल्या अंतरामध्येच दडवून ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे.''

आपण जेव्हा तिसऱ्या तिळावर एकाग्र होतो, ज्या वस्तूच्या शोधामध्ये आपण बसलेलो असतो, ती वस्तू आपणांस अंतर्यातच मिळते. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या मनास शांत करणे गरजेचे आहे. मनास शांत करणे म्हणजे ध्यान–अभ्यासादरम्यान आपल्या मनात जे काही या जगाविषयी संकल्प–विकल्प उठत असतात, त्या सर्वांना विसरा, कारण शांत मनच ध्यान–अभ्यास करू शकते. ध्यान–अभ्यासास एखादे ओझे न समजता, तो प्रेमाने व आत्मियतेने करा. बाहेर होणाऱ्या खडबडीकडे लक्ष देऊ नका. प्रत्येक व्यक्ती आप–आपल्या कामामध्ये दंग आहे, ते आमच्या कामात लक्ष देत नाहीत, म्हणून आपले देखील कर्तव्य आहे की आपण त्यांनी केलेल्या आवाजांकडे लक्ष देऊ नये. आपण आपल्या मनास बाहेर भटकू न देता तिसऱ्या तिळावर एकाग्र करणे गरजेचे आहे. बंधूंनो, डोळे बंद करून ध्यानात बसा. ***

सेवा

सत्संग : परम संत अजायब सिंहजी महाराज
गुरु अर्जुनदेवजी महाराजांची वाणी – मुंबई – ९ जानेवारी १९९६

परमपिता परमात्मा सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार असो, ज्यांनी अपार कृपा करून आपणांस त्यांचे गुणवर्णन करण्याची संधी दिली आहे. अशा रितीचे सत्संगाचे कार्यक्रम त्यांच्या कृपेमुळेच आपण करू शकतो, कारण जर त्यांनी एखाद्यास विसर पाडला तर ती व्यक्ती कधीच भक्ती करू शकत नाही, तसेच ज्या व्यक्तीस ते भक्ती मार्गात आणतात, ती व्यक्ती भक्तीचा त्याग करू शकत नाही. त्या कर्त्या–करवित्या परमात्म्याच्या हातात आपले जीवन व मृत्यु आहे. तो स्वत:च्या मर्जीनुसार हवे तसे घडवू शकतो. त्याने आपल्यावर अपार दया केली तेव्हाच आपण त्याची भक्ती, त्याचे गुणवर्णन करीत आहोत.

प्रियजनहो! संतमाचा पूरेपूर फायदा करून घेण्यासाठी आपणांस सर्वप्रथम गुरु–आज्ञेचे पालन करण्याची सवय करून घ्यावयास हवी. त्यानंतर नम्रतेचे अवलंबन करावयास हवे, परंतु आपण नम्रतेचे आचरण तेव्हाच करु शकतो जेव्हा आपण गुरु–आज्ञेचे पालन करणे शिकतो.

प्रियजनहो, आज्ञेचे पालन करणाऱ्या प्रेमीस कोणतीही **सेवा** मिळाली किंवा कोणत्याही प्रेमीने त्यास तन, मन वा धनरूपी **सेवा** करण्यास सांगितले तरी तो त्या सेवेचा फायदा करून घेण्याचा प्रयत्न करतो. तो प्रेमी, सतगुरुंच्या इतर सेवकांच्या आदेशासही, सतगुरुंचाच आदेश मानतो. कारण त्या सेवकासही सतगुरुंनीच आदेश दिलेला असतो की तू लंगरमध्ये **सेवा** करावीस अथवा तेथे संगतला बसण्यासाठी सतरंज्या अंथरण्याची **सेवा** करावीस. तेथे स्वतःतर्फे ना कोणी सतरंज्या अंथरतो, ना कोणी पाणी भरतो वा ना कोणी स्वयंपाक बनवितो. हे सर्व सतगुरुंमुळेच होत असते. संत–सतगुरुंमुळेच संगत एकत्र येत असते. त्यामुळे आपण त्यास गुरुआज्ञा (हदीश) समजणे गरजेचे आहे. आपणांस **सेवा** करण्याची सवय असणे जरूरीचे आहे.

आपणासर्वांना कल्पना आहे की सत्संगाचा कार्यक्रम कॅनडा, अमेरिका, कोलंबिया, मेक्सिको वा हिंदुस्थान यांपैकी कुठेही असो, कोणताही सेवादार पगार घेत नाही. संगतच्या सेवेस सतगुरुंचीच **सेवा** समजून सर्व प्रेमी निःस्वार्थपणे **सेवा** करतात. त्या सेवेमध्ये आपण जरी थोडा फार सहयोग केल्यास, आपणही त्याद्वारे सतगुरुंची खुषी व कृपा प्राप्त करून घेऊ शकतो, मग ती **सेवा** तनाची असो, मनाची असो वा धनाची असो. आपण मनाची (ध्यान–अभ्यासाची) **सेवा** टाळू नये. कारण आपण जर आपल्या मनाद्वारे नामस्मरण केल्यास, जे प्रेमी संगतसाठी दररोज सतरंज्या अंथरतात व स्वयंपाक करतात त्या प्रेमींना आपल्याद्वारे काही तरी लाभ होईल. सतगुरुंनी ज्या प्रेमींना धनाची **सेवा** करण्याची जबाबदारी दिलेली असते, त्या प्रेमींचे धन आपण ध्यान–अभ्यास केल्यानेच पवित्र होईल. कारण त्या लोकांच्या सहकार्यामुळेच आपण येथे बसून ध्यान–अभ्यास करू शकलो, सत्संग ऐकू शकलो.

मी मागील वेळी कोलंबियामधील बगोटा येथे सत्संग केला होता. तेथे उपस्थित असलेले अनेक प्रेमी येथे देखील बसलेले आहेत, ज्यांनी पाहिले आहे की तेथे किती मोठ्या प्रमाणावर प्रेमी आले होते तरीही तेथे केली गेलेली व्यवस्था किती अप्रतिम होती? तेथील लंगरची **सेवा** करणाऱ्या सेवादारांनी देखील अत्यंत मनोभावे **सेवा** केली होती. मी दररोज लंगरमध्ये जात असे. तेथील सेवादारांचे व्यवस्थापन पाहून हृदय हर्षित होत असे की ते दररोज ताजे व निरनिराळ्या प्रकारचे जेवण बनवत असत. तुम्हांस कल्पना आहे की संतांना त्यांची संगत, त्यांना स्वतःच्या जीवापेक्षाही अधिक प्रिय असते. संतांच्या मुलांना उत्तम भोजन मिळाल्यास, ते अधिकाधिक ध्यान–अभ्यास करणार नाही का? संत त्यांच्या मुलांना आवडीने जेवताना पाहून खूष होतात व मुले ध्यान–अभ्यास करताना पाहून त्यांना आणखीन जास्त आनंद होतो.

तेथे कोणाच्याही लक्षात येत नव्हते की सेवादारांचे व्यवस्थापन कोण करीत आहे? कोणाच्या आदेशाचे पालन तेथे होत आहे? सर्व सेवेदारांना जबाबदाऱ्या वाटून दिल्या गेल्या होत्या व त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव

अगोदरपासूनच होती, प्रत्येकजण आपाआपल्या वाट्यास आलेली **सेवा** करण्यात गर्क होता. तेथे जो टाईम लंगरचा तसेच सत्संगाचा ठरविला गेलेला होता त्यास अनुसरुन व्यवस्थापन चोख होते. तेथील प्रत्येक गोष्टीचे व्यवस्थापन सतगुरु कृपालजींच्या कृपादृष्टीमुळे उत्कृष्ठ होते. तेथे अमेरिका तसेच इतर देशांमधूनही अनेक नवीन प्रेमी आलेले होते. त्यापैकी प्रत्येकजण या विचाराने हैराण झाला होता की येथे एवढ्या मोठ्या प्रमाणावर जमा झालेल्या प्रेमींची व्यवस्था कशीकाय होईल? मोठ्या प्रमाणावर संगत जमा झाल्याने, ज्या ठिकाणाहून दर्शन होऊ शकत नव्हते, त्या ठिकाणी कोणतीही गडबड न होता, सेवादारांनी तत्काळ टेलिव्हिजन आणून लावले. जेव्हा कोठेही सत्संगाचा कार्यक्रम असतो, तेथे आपल्यापैकी प्रेमींनीच **सेवा** करावयास हवी.

गुरु अर्जुनदेवजींच्या वेळीच्या माहणा जट्ट या सेवकाचे उदाहरण देत असतो. तो ना ध्यान-अभ्यास करीत असे, ना सत्संगाच्या कार्यक्रमामध्ये **सेवा** करीत असे, ना तो लंगरमध्ये भाजी वगैरे कापण्याची **सेवा** करीत असे. आजकाल पाण्याच्या तोट्यांद्वारे वा पाण्याच्या टँकरद्वारे पाण्याची व्यवस्था केली जाते. त्यावेळी मात्र पाणी हातानेच शेंदले जाई व डोक्यावरून वाहिले जात असे. माहणा जट्टास जर इतर सेवक लंगरमध्ये भाजी कापण्यास वा पाण्याची **सेवा** करण्यास सांगत, तेव्हा तो नेहमी अतिशय क्रोधामय शब्दांनी उत्तर देत असे, ''तुम्ही तर माझ्याप्रमाणेच माझे गुरुबंधू आहात. मी तुम्ही सांगितलेले काम का बरे करावे? मला जर गुरुसाहेबांनी **सेवा** सांगितली तर मी नक्की करेन.''

तुम्हास कल्पना आहे की जो सतगुरुंच्या शिष्यांचे सांगणे ऐकत नाही, त्यास त्याचे मन सतगुरुंविरूध्द देखील बंडखोरी करण्यास सांगते. सेवादारांनी माहणा जट्ट विषयी गुरुसाहेबांकडे तक्रार केली की, माहणा जट्ट ध्यान-अभ्यासही करीत नाही व **सेवा** देखील करीत नाही. लंगरमधून जेवण जेवून आरामात आड पडून मात्र राहतो. आम्ही सेवेविषयी त्याच्याशी बोलू लागताच तो आमच्याशी वाद घालू लागतो, मारहाणी सुद्धा करतो.

या संदर्भात गुरुसाहेबांनी माहणा जट्टास बोलावून घेतले असता, तो म्हणू लागला की,''तुम्ही सांगाल, ती **सेवा** करण्यास मी तयार आहे.'' त्यावर गुरु साहेब म्हणाले,''तू बाहेर जंगलामध्ये जा, तेथे चिता रच व तीमध्ये जळून जा.'' कारण अशाप्रकारच्या शिष्यांची सतगुरु देखील परिक्षा घेतात, की हा कोठपर्यंत आपल्या आज्ञेचे पालन करतो हे पहावे. माहणा जट्टाने बाहेर जंगलात जाऊन लाकडे एकत्र करून चिता रचली, ती मध्ये अग्नीदेखील प्रज्वलीत केला. परंतु त्या अग्नीमध्ये उडी घेण्याचे धारिष्ट्य त्याचे हृदय करीत नव्हते. तो त्या अग्नीच्या चौफेर फेऱ्या मारू लागला.

तेवढ्यात तेथे एक चोर चोरी करून आला. तेथील दृश्य पाहून त्याने माहणा जट्टास विचारले की,''प्रिय बांधवा! तू अग्नीच्या आजूबाजूस फेऱ्या का बरे मारीत आहेस?'' माहणा जट्टने आपली सर्व घटना त्या चोरास सांगितली. ते ऐकून चोर त्यास म्हणाला, ''तू गुरुंचा आदेश मला दे व माझ्याजवळ असलेले हे भरपूर धन तू घेऊन टाक.'' माहणा जट्टने विचार केला! यापेक्षा स्वस्त सौदा कोणता बरे असू शकतो. आपणास केवळ बोलायचेच आहे. त्याप्रमाणे माहणा जट्टने, तू अग्नीमध्ये जळून जा, असे म्हणून चोराजवळचे धन ताब्यात घेतले. त्या चोराने अग्नीत उडी घेतली. परमात्मा अर्जुनदेवजींनी त्याचा सांभाळ केला व त्याची जन्म-मरणाच्या संकटातून सुटका झाली.

येथे माहणा जट्ट घरी येत असता मनसुबे बनवित होता की परत जाऊन मोठे घर बांधावे, पत्नीस चांगले दाग-दागिने बनवावेत. त्या चोरांस पकडण्यासाठी पोलीस त्याचा पाठलाग करीत होते. तुम्हांस कल्पना आहे की ज्याच्याजवळ चोरीचा माल असतो, त्यास चोर म्हटले जाते. पोलीसांनी माहणा जट्टास पकडले. चोरी एका श्रीमंत घरी झालेली होती व तेथे खून देखील झाला होता. त्याची शिक्षा म्हणून माहणा जट्टास फाशीची शिक्षा दिली गेली. हे सांगण्यामागे, माझा तुम्हांस हेच समजावण्याचा उद्देश आहे की आपले मन ध्यान-अभ्यासा पासून, गुरु-आज्ञेचे पालन करण्यापासून आपणांस बंडखोरी करण्यास परावृत्त करते. म्हणूनच आपणांस जी काही **सेवा** मिळते, ती विनम्रतेने करावयास हवी.

प्रियजनहो! आम्ही महाराज सावन सिंहजींच्या वेळी पहात होतो की अनेक प्रेमी लंगरमध्ये रात्रंदिवस सेवा करीत असत, तर काहीजण बिल्कूल **सेवा** करीत नसत. उलट **सेवा** करणाऱ्या सेवादारांना ते धमकावत असत. त्याबद्दलची तक्रार सेवादार महाराज सावन सिंहजींकडे करीत की ते स्वतः तर **सेवा** करीत नाहीतच, वर आम्ही **सेवा** ठीक करीत नाही म्हणून ते आम्हांस धमकावतात. त्यावर महाराज सावन सिंहजी म्हणाले, ''तुम्ही तुमची **सेवा** करावी, तुम्हांस त्या लोकांशी काय देणे घेणे आहे, त्यांचे मन अतिशय जबरदस्त (प्रबळ) आहे. तुम्ही त्यांना **सेवा** करण्यास सांगितले तर ते तुमचा विरोध करतील. परंतु असे जीव संतमतामध्ये येऊनही काय प्राप्त करतात? लंगरमधून भाकरी खाऊन, इतरांची निंदा करीत ते रिकाम्या हातानेच सत्संगामध्ये येतात व रिकाम्या हातीच परत जातात.''

मी सैन्यात असताना, आमचा विक्रम सिंह नामक कमांडर होता, तो अतिशय चांगला मनुष्य होता. तो महाराज सावन सिंहजींचा नामधारी होता. सैन्यामध्ये जनरल हे पद अतिशय उच्चपद असते. त्याच्या पुढेमागे वायरलेस असतात, तसेच सोबत दोन-तीन गाड्यादेखील असतात. परंतु तो जेव्हा लंगरमध्ये येई तेव्हा पाण्याने बादल्याभरून लंगरची **सेवा** करीत असे. तो म्हणे ''मला या घरातूनच सर्वकाही प्राप्त झाले आहे व यापुढेही इथुनच प्राप्त होईल. मला या घरातून प्राप्त करणे फार महत्वाचे आहे.''

पाणी पखा पीसु दास कै तब होहि निहालु ।।
राज मिलख सिकदारीआ अगनी महि जालु ।।

त्याकाळी लंगरमध्ये वापरले जाणारे पीठ जात्याने दळले जाई. असेच पीठ हुज़ूर सावन सिंहजी महाराजजींच्या वेळी वापरले जाई, कारण त्याकाळी हिंदुस्थानात यंत्रे नव्हती. गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगतात,''**सेवा** करते वेळी तुम्ही असा विचार करू नये की आपण पदाने जनरल वा बॅरिस्टर-न्यायाधीश आहात. ही या जगातील पदे मृत्यूनंतर तुमच्या सोबत जाणार नाहीत. तुम्ही केलेली **सेवा** मात्र येथे तसेच मृत्यूनंतर पुढेही उपयोगी पडेल.

तुम्ही असे कार्य करावे, जे तुमच्या अंतिमवेळी उपयोगी पडेल, ते कार्य म्हणजे सतगुरुंची **सेवा** हे आहे.'' स्वामीजी महाराज म्हणतातः

गुरु नहीं भूखा तेरे धन का उनपे धन है भक्ति नाम का ।
पर तेरा उपकार करावे भूखे प्यासे को दिलवावे ।
उनकी मेहर मुफ्त तू पावें जो उनको प्रसन्न करावे ।।

सतगुरु आपल्या तन, मन वा धन यापैकी कोणत्याही वस्तूचे भुकेलेले नसतात. परमात्म्याने त्यांना सर्वकाही उपलब्ध करून दिलेले असते.

सन्त जना का छोहरा तिसु चरणी लागि ।
माइ आधारी छत्रपति तिन्ह छोडउ तिआगि ।।

आपण सांगता, संतांचा नामधारक सेवक भलेही गरीब असेल, परंतु तो निःसंशयपणे या संपूर्ण जगाच्या चक्रवर्ती राजापेक्षा श्रेष्ठ आहे, कारण मृत्यूनंतर या जगातील ना राजमुकुट ना राजगादी सोबत जाईल.'' गुरु नानक म्हणतातः

कल्ला आया है कल्ला ही जाएगा ।।

सतगुरुंवर तुम्ही प्रेम केलेत, त्यांच्या आदेशाचे पालन केलेत, तरच परमात्मारूपी सतगुरु तुम्हास सोबत देतील. तुम्ही जर एखाद्या गरीब सत्संगी व्यक्तीच्या घरी गेलात, तर त्याच्या घरातूनच तुम्हास ध्यान–अभ्यासाचा सुगंध येऊ लागेल. तो तुम्हांस म्हणेल की मी येथे ध्यान–अभ्यासासाठी बसतो. चला! आपण थोडा वेळ एकत्र ध्यान–अभ्यासासाठी बसू या. मी जेव्हा एखाद्या मोठ्या मुनष्यास भेटण्यास जातो, तेव्हा पप्पू, गुरुमेल माझ्या सोबत असतात. तेथे तो मनुष्य स्वार्थाच्याच गोष्टी बोलत राहतो. ध्यान–अभ्यासाविषयी काहीच बोलत नाही.

सन्तन का दाना रूखा सो सरब निधान ।
गृहि साकत छतीह प्रकार ते बिखू समान ।।

आता आपण प्रेमाने सांगता, ''संतांच्या संगतीमध्ये जाऊन अनेक दिवसांची शिळी–चपाती जरी खावयास मिळाली, तरीही त्यातून आपणांस रस प्राप्त होतो. ती खाऊन रात्रभर ध्यान–अभ्यासामध्ये बसून परमात्म्याचे

स्मरण तरी कराल. दुसऱ्या बाजूस राजाने दिलेले अन्न, मग ते भलेही त्यात छत्तीस वेगवेगळ्या मिष्ठांनांचा समावेश असेल, तरीही ते विषासमानच आहे. अशी पक्वान्ने खाऊन तुमच्या अंतरात शुद्ध विचार येणार नाहीत, तुम्ही ध्यान–अभ्यासामध्ये एकाग्र होऊ शकणार नाही.

द्वापर युगाच्या अखेरीस भगवान कृष्ण या जगात अवतरले होते. ते कौरव–पांडवांचे सख्खे चुलत भाऊ होते, तसेच हिंदुस्थानचे राजेदेखील होते. कौरव–पांडवांचा आपआपसांमध्ये विवाद झाला असता, भगवान कृष्ण त्यांच्यामध्ये समेट घडविण्यासाठी त्यांची राजधानी हस्तिनापूर येथे गेले, ज्या शहरास आज दिल्ली असे संबोधले जाते.

महाभारत वाचले असता आपल्यास समजते की कृष्ण येत असल्याने त्याच्या स्वागताची दुर्योधनाने उत्तम व्यवस्था केली. भोजनासाठी उत्तम, चविष्ट पदार्थ बनविले गेले. परंतु भगवान कृष्ण त्यांना प्रिय असलेल्या गरीब विदुराच्या घरी गेले.

सकाळी जेव्हा समेट घडविण्यासाठी सर्वजण एकत्रीत होऊन दरबारामध्ये बसले तेव्हा दुर्योधनाचा रागाने तिळपापड झाला होता. भगवान कृष्ण आपल्या राजमहालात न येता, गरीब विदुराच्या घरी राहिल्याने राजाचा अपमान झाला या भावनेने दुर्योधनाच्या रागाचा पारा वर चढलेला होता. तो कृष्णास म्हणाला, ''तू तेथे विदुराच्या घरी छान छान पुऱ्या व हलवा वगैरे खाल्ले असशील, विशाल व मऊ पलंगावर झोपला असशील, तुला तेथे काय मिळाले?'' खरे तर जी भाजी भगवान कृष्णांनी विदुराच्या घरी खाल्ली, ती अळणी होती, त्यात मिठच घातलेले नव्हते. भगवान कृष्णाने जे उत्तर दुर्योधनास दिले, त्याचे वर्णन करीत भक्त नामदेव आपल्या वाणीमध्ये लिहितातः

खीर समान साग मैं खाया गुण गावत रैण बिहाणी ।
नामे का स्वामी आनन्द विरोधी जात न काहूँ की जानी ।।

श्रीकृष्ण म्हणतात,''मी रात्री जी भाजी खाल्ली, ती खीर–पुऱ्यांपेक्षाही अधिक स्वादिष्ट होती, कारण ते खाऊन मी रात्रभर ध्यानात तल्लीन

राहिलो. माझ्यासाठी तर गरीब वा श्रीमंत यांपैकी कोणी श्रेष्ठ वा कनिष्ठ नाहीत, तर ते दोघेही एकसमान आहेत. आम्ही तर त्यांच्या अंतर्यातील प्रेम, आपुलकी व तळमळ पहातो.''

गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगतात, ''गरीब साधू व नामधाऱ्याच्या घरी जर तुम्हास खाण्यासाठी चपातीचे शुष्क तुकडे जरी मिळाले, तरी ते लाखो पटींनी श्रेष्ठ आहेत, कारण ते खाऊन तुम्ही ध्यान–अभ्यास करता. साकत मनुष्य परमात्म्याची आठवण करीत नाही, त्याची भक्ती करीत नाही. त्यामुळे त्याच्याकडील जेवण, ज्यामध्ये छत्तीस प्रकारच्या मिष्ठान्नांचा समावेश असेल, तरीही ते विषासमानच आहे. कारण ते अन्न खाल्ल्याने आपल्या अंतरात विषय–विकारांचे विषच निर्माण होते.''

भगत जन्हा का लूगरा ओढि नगन न होई ।
साकत सिरपाउ रेसमी पहिरत पति खोई ।।

गुरु नानकदेवजी महाराज सांगत आहेत. संत–महात्म्यांनी त्यांच्या स्वहस्ते तुम्हांस एखादे फाटके कापड जरी दिले, तरी ते कापड एखाद्या राजा–महाराजांद्वारे तुम्हांस बक्षिस वा मानपान म्हणून मिळालेल्या फेट्यापेक्षा लाखपटीने श्रेष्ठ आहे. कारण तुम्ही जेव्हा संतांनी ते दिलेले कापड पहाल, तेव्हा तुम्हांस ध्यान–अभ्यास, सतगुरुंचे स्वरूप आठवेल, तसेच नामाकडे लक्ष जाईल, कारण ते कापड संतांनी दिले आहे. हे तुम्हांस आठवेल.

मातब व्यक्तींच्या हस्ते मानाचा मिळालेला फेटा पाहून हृदयात अहंकार येतो की आपण किती श्रेष्ठ खेळाडू होतो की धावण्याच्या स्पर्धेमध्ये आपणांस हे चषक व ह्या ट्रॉफ्या मिळालेल्या आहेत. असे फेटे व चषके हृदयात अहंकारच निर्माण करतात. मी स्वत: धावण्याच्या स्पर्धेत भाग घेऊन अशा प्रकारची अनेक चषके व ट्रॉफ्या जिंकल्या आहेत. मला जाणीव आहे की त्या मिळाल्यावर माझ्या हृदयात किती अहंकार निर्माण झाला होता. जोपर्यंत ती बक्षिसे माझ्यासोबत होती, तोपर्यंत हृदयामध्ये अहंकारच असे; परंतु शेवटी महाराज कृपालजींच्या कृपेने ती बक्षिसे नजरेपासून दूर केली.



मला धावण्याच्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी दोन वेळा इंग्लंडला जाण्याची संधी मिळाली. स्पर्धेत भाग घेतेवेळी ठळक अक्षरांमध्ये इंडिया असे लिहिलेली बनियान मिळत असत. खरे तर ती बनियान घातल्यानेच आमची फुशारकीने छाती पुढे येई. आम्ही जेव्हा ते बनियान हिंदुस्थानमध्ये आल्यावर घालत असू, तेव्हा प्रत्येकजण आमच्याकडे अंगुली निर्देश करून म्हणत असत की खेळांमध्ये सहभाग घेण्यासाठी हे इंग्लंडला गेले होते. अशा वेळी आमच्या अंतरात जरी अहंकार नसेल, तरी आमच्याकडे पाहणारे तसा अहंकार निर्माण होण्यासाठी कारणीभूत होत. माझ्याकडे मी महाराजजींची चितेची राख सांभाळून ठेवलेली आहे. तसेच महाराज सावन व महाराज कृपाल सिंहजी बसलेले चादरी व कपडेदेखील सांभाळून ठेवलेले आहेत. महाराजजींच्या या निशाण्या पाहून कृपालजींची आठवण येते तसेच त्यांच्याकडे पाहून अभिमान देखील वाटतो.

गुरु अर्जुनदेवजी या वाणीमध्ये जो काही उपदेश करीत आहेत, तो त्यांचा स्वानुभव आहे म्हणून एखाद्या महात्म्यांनी आपल्यावर खूष होऊन जर एखादा फाटका कपडा जरी आपणांस दिला असेल तरी तो सांभाळून ठेवावा, त्या कपड्याचा आपण आदर करावयास हवा.

साकत सिउ मुखि जोरिए अध बीचहु टूटै ।
हरिजन की सेवा जो करे इत ऊतहि छूटै ।।

गुरु अर्जुनदेवजी महाराज या वाणीमध्ये सांगत आहेत, आपण जर साकत व्यक्तींशी, दुर्जनांशी मैत्री किंवा स्नेहसंबंध ठेवल्यास त्यांची सोबत आपल्या मृत्यूनंतर या जगातच मागे राहिल. आपले एकमेकांशी दहा-वीस वर्षांचे जरी थोडे-फार प्रेम असेल, तरीही मृत्यूसमयी तो आम्हांस सोडून देईल किंवा आपण त्यास सोडून निघून जाऊ. परंतु आपण आपल्या जीवनात जर सतगुरुंची **सेवा** केली असल्यास, नामस्मरण केलेले असल्यास, आपण ह्या संसारातील जीवनामध्येही सुखी असू, आपल्या मनास शांती लाभेल तसेच मृत्यूनंतर आपल्या आत्म्याच्या पुढील वाटचालीसाठी देखील ती **सेवा** मदत करेल. तिच वस्तू आपल्यासोबत परमात्म्याच्या दरबारामध्ये जाईल.

सभ किछु तुम्ह ही ते होआ आपि बणत बणाई ।
दरसनु भेटत साध का नानक गुण गाई ।।

आता गुरु अर्जुनदेवजी महाराज परमात्म्याची महानता वर्णन करीत म्हणत आहेत की,''सर्व काही तुझ्याच हातात आहे. सतगुरु व शिष्य यांच्या नात्याचा खेळ तू स्वतःच रचलेला आहेस. **सेवा** करण्यासाठी सेवादार देखील तूच बनतोस. सेवादारांमध्ये सुद्धा तुझेच अस्तित्व आहे, तसेच सेवादार ज्यांची **सेवा** करतो त्यांच्या अंतर्यात देखील तूच सामावलेला आहेस. भांड्यांमध्ये अन्न वाढणारा तूच आहेस, तर ते अन्न खाणाराही तूच आहेस. संगतसाठी सतरंज्या अंथरणारा देखील तूच आहेस व त्यांच्या घड्या करुन आवरणाराही तूच आहेस. संगतचा निरोप घेणाराही तूच आहेस तर अन्न-धान्याचे भांडार नेहमी भरलेले राहो आणि संगत असेच अन्न सदैव प्राशन करत राहो असे म्हणणाराही तूच आहेस. गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगत आहेत, ''तुम्ही संगतमध्ये गेल्यास, तेथे साधूचे दर्शन घेतल्यास तुम्हांसही परमात्म्याची आठवण येईल, तुम्ही भक्ती मार्गावरुन दूरावलेले असलात तरी देखील परमात्म्याची भक्ती करण्यासाठी बसाल. साधूंचे वचन ऐकून आपण आपल्या चुका व दोष सुधारतो आणि साधूंचे दर्शन जे आपल्या पापांचे क्षालन करते, त्याचा तर काही हिशोबच नाही. कबीर साहेब म्हणतातः



कबीरा संगत साध की साहिब आवे याद ।
लेखे में सोई घड़ी बाकी के दिन बाद ।।

साधूंचे दर्शन केल्यावर साहेबाची (परमात्म्याची) आठवण येते. जितके दिवस आपण संतांची संगत केली, बसून त्यांचे दर्शन घेतले, त्याची नोंद आपली पारमार्थिक कमाई म्हणून होते. बाकी आपण जे या जगात फिरतो, कामकाज करतो, लोकांना भेटतो, त्याचा पुढे परमार्थामध्ये काहीच उपयोग होत नाही, परमेश्वराच्या दरबारात ते सर्व व्यर्थच असते.

सन्त की गैल न छोड़िए मार्ग लगया जाए ।
पेखत ही पुनीत होए भेटत जपिए नाम ।।

गुरु अर्जुनदेव महाराजजींनी आपणांस **सेवा**, भक्ती आणि गुरुप्रेमाविषयी समजावून सांगितले आहे. आपण देखील आपले जीवन सफल करावयास हवे. परमात्मा जी काही आपणांस कोणत्याही सत्संगाच्या कार्यक्रमामध्ये जाण्याची संधी देत असतो, त्याचा पूर्णपणे फायदा करून घ्यावा, तेथे **सेवा** करावी, तेथे झोपून आपला वेळ वाया घालवू नये. ***